www.rajdand.com
पुणे, बुधवार
15.02.2023
पृष्ठ : ४ । मूल्य : ₹ ४.०० । माघ कृ.१०
/rajdandlive
Declaration No. : SDM/SR/07/2023

मराठी माणसाचा मानदंड
# राजदंड
स्थापना १९९९
मुख्य संपादक : राही भिडे

यूएस राष्ट्रपती निवडणूक २०२४ : भारतीय वंशाच्या निक्की हेली अमेरिकेच्या पुढील राष्ट्राध्यक्षाची निवडणूक लढवणार

पान ४ वर..




# रस्ता ओलांडणाऱ्या १८ महिलांच्या घोळक्याला जीपने चिरडले

## पुणे-नाशिक महामार्गावर भीषण अपघात; पाच महिला ठार, तेरा महिला जखमी

**राजगुरूनगर : प्रतिनिधी**

**पुणे-नाशिक महामार्गावर शिरोली ( ता. खेड ) येथील खरपुडी फाट्यावर सोमवारी (दि. १३) रात्री गंभीर अपघात झाला. या अपघातात रस्ता ओलांडणाऱ्या १८ महिलांच्या घोळक्याला पुण्याकडून येणाऱ्या अज्ञात चारचाकी वाहनाने जोरदार धडक दिली. या अपघातात पाच महिला रस्त्यावर पडुन अक्षरशः चिरडल्या गेल्या. यातील दोन जागीच ठार झाल्या, तर तीन महिलांचा रुग्णालयात उपचार सुरु असताना मृत्यू झाला. यात १३ महिला गंभीर जखमी झाल्या असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले व पोलीस निरीक्षक राजकुमार केंद्रे यांनी दिली.**



खरपुडी रस्त्यावर असलेल्या एका कार्यालयात मंगळवारी असलेल्या लग्नाच्या कार्यक्रमात जेवण बनवून वाढपी काम करण्यासाठी १८ महिला पीएम पीएल बसने आल्या होत्या. सर्व महिला रस्ता ओलांडत असताना पुण्याच्या बाजूने वेगात आलेल्या महिंद्रा एक्सयुव्ही जीपने १८ महिलांच्या घोळक्यातील ८ महिलांना जोरदार धडक दिली. यात पाच महिला वाहनाच्या धडकेत रस्त्यावर पडुन अक्षरशः चिरडल्या गेल्या. त्यातील दोन जागीच ठार झाल्या. एका महिलेचा रुग्णालयात उपचार सुरु असताना मृत्यू झाला. दरम्यान मंगळवारी पहाटे एकीचा पुण्यातील ससून रुग्णालयात मृत्यू झाला.

शोभा राहुल गायकवाड, सुनंदा सटवा गजेशी (वय ६२, रा. कात्रज), सुशीला वामन देढे (वय ७०, रा. रामटेकडी), इंदुबाई कोंडीबा कांबळे (वय ४७, रा. किरकटवाडी), राईबाई पिरप्पा वाघमारे (वय ५५, रा. रामटेकडी, पुणे ) असे अपघातात मृत्यु झालेल्या महिलांची नावे आहेत. यातील तीन महिलांची प्रकृती चिंताजनक आहे. उर्वरित महिलांना गंभीर दुखापत झाली असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले यांनी दिली.

**तीव्र उतारामुळे पुण्याकडून वेगात येणारे वाहन नियंत्रित होत नाही. म्हणून उतार सुरू होण्याआधी २०० मीटर वर पांढरे पट्टे, नंतर १०० मीटरवर स्ट्रम्बलिंग स्ट्रिप्स व उताराआधी १ मीटर वर स्पीड ब्रेकर बसवणे आवश्यक आहे.**

**– अविनाश गावडे, प्रवासी, राजगुरूनगर**

अपघात स्थळापासून जवळच असलेल्या एका मंगल कार्यालयात वाढपी काम करण्यासाठी या महिला पुण्यातील स्वारगेट, खडकवासला, किरकटवाडी, रामटेकडी परीसरातून आल्या होत्या. पुण्याच्या बाजूने बसमधून आल्यावर खरपुडी फाटा येथे या सर्वजणी उतरल्या. पश्चिम बाजूकडून पूर्वेकडे महामार्गावरून त्या घोळक्याने जात होत्या. याच वेळी काळाने त्यांच्यावर घाला घातला. पुणे बाजूकडून वेगात आलेल्या वाहनाने या सर्वांना जोरदार धडक दिली. यात पाच महिला ठार झाल्या. तर १३ जणी जखमी झाल्या. अपघात झाल्यावर धडक देणारी जीप दुभाजकाला धडकली.

घाबरलेल्या चालकाने ती दुभाजकावरून फिरवुन पुन्हा दुसऱ्या बाजूने पुण्याच्या दिशेने धूम ठोकली. पोलिसांनी या वाहनाचा शोध घेतला. मात्र अद्याप तपास लागला नसल्याचे भोसले यांनी सांगितले. सारिका देवकर, वैशाली लक्ष्मण तोत्रे व शोभा सुभाष शिंदे अपघातात गंभीर जखमी झाल्या आहेत.

### पोलिसांची तातडीने भूमिका

रात्रीच्या अंधारात घडलेला अपघात भीषण होता. रस्त्यावर रक्तबंबाळ व छिन्नविच्छिन्न अवस्थेत पडलेल्या महिलां-बरोबरच्या महिलांचा मदतीसाठी आक्रोश यामुळे पाहणाऱ्या व्यक्तीला धडकी भरत होती. याचवेळी राजगुरूनगर ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक भारत भोसले येथुन पुण्याकडे निघाले होते. त्यांनी थांबुन तातडीने मदत कार्य सुरू केले.

**कोणतेही वाहन नसल्याचे खात्री करून आम्ही सर्वजणी रस्ता ओलांडत होतो. धडक देणारे वाहन आमच्यापर्यंत कधी आले आम्हाला कळले पण नाही. काही गाडीखाली तर काही जणी हवेत उडाल्याचे आम्ही पाहिले. काही क्षणात आमच्या सहकारी जगाचा निरोप घेऊन गेल्या. हातावर पोट असलेल्या महिलांना आम्ही काम देतो. कुटुंबाचा प्रमुख असलेल्या सर्वजणी आहेत. पण असा दुर्दैवी प्रसंग या कुटुंबात अंधार पडायला कारणीभूत ठरेल असे वाटले नव्हते.**

**– शिवानी कैलास माने, केटरिंग महिलांच्या ठेकेदार**

### उपाययोजना करण्याची गरज

पुण्याकडून येणाऱ्या वाहनांचा वेग नेहमीच जास्त असतो. येथील फाट्यावरून शिरोलीच्या काही वस्त्या तसेच खरपुडी गाव व खंडोबा देवस्थानकडे जाण्यासाठी मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. त्यातच महामार्गाजवळ तीन ते चार मंगल कार्यालय आहेत. अनेकदा अपघात घडतात. कालच्या भीषण अपघाताची महामार्ग प्रशासनाने दखल घेऊन उपाययोजना कराव्यात अशी मागणी होत आहे.

# चिंचवड विधानसभेत वंचितचा पाठिंबा मिळविण्यासाठी रस्सीखेच

**पुणे : प्रतिनिधी**



चिंचवड विधानसभेत वंचितचा पाठिंबा मिळविण्यासाठी रस्सीखेच सुरू झाली आहे. बंडखोर राहुल कलाटे यांच्यानंतर आता राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार नाना काटे यांनी ही वंचितला तसा प्रस्ताव पाठवला आहे. वंचितच्या प्रदेशाध्यक्ष रेखा ठाकूर यांच्याकडे पत्राद्वारे या दोघांनी ही पाठिंब्याची मागणी केलेली आहे. सध्या वंचितने उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेसोबत आघाडी केलेली आहे. परंतु २०१९च्या विधानसभेत बंडखोर राहुल कलाटेंना वंचितने पाठिंबा दर्शवला होता. त्यामुळे आता या पोटनिवडणुकीत प्रकाश आंबेडकर कोणाच्या बाजूने उभे राहतात हे पाहणं महत्वाचं राहणार आहे.

चिंचवड विधानसभा मतदार संघात तिहेरी लढत होणार आहे. भाजपकडून दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या पत्नी अश्विनी जगताप, महाविकास आघाडीकडून नाना काटे आणि शिवसेनेचे बंडखोर उमेदवार राहुल कलाटे यांच्यात लढत होणार आहे. तिन्ही उमेदवार दणक्यात प्रचाराला लागले आहे. त्यामुळे तिघांमध्येही तगडी लढत होण्याची शक्यता आहे. त्यातच अनेक घटक पक्षांच्या पाठिंब्याची मागणी महाविकास आघाडी आणि बंडखोर उमेदवारांकडून केली जात आहे. त्यात वंचित बहुजन आघाडी यांच्या पाठिंब्यासाठी दोन्ही उमेदवारांकडून रस्सीखेच सुरु आहे.

चिंचवडमध्ये महाविकास आघाडीकडून नाना काटे उमेदवार आहेत. त्यांच्या प्रचाराचा नारळ जयंत पाटील यांनी फोडला आणि धुमधडाक्यात प्रचाराला सुरुवात केली. त्यासोबतच महाविकास आघाडीचे कार्यकर्तेदेखील मोठ्या संख्येने उपस्थित राहत सभा आणि पदयात्रा पार पाडताना दिसत आहे. शिवसेना, काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सगळ्या कार्यकर्त्यांकडून जोरात प्रचार सुरु आहे. त्यांच्या सोबतच राज्यातील महाविकास आघाडीचे मोठे नेतेदेखील सभा आणि रोड शो करताना दिसत आहे. विरोधी पक्षनेते अजित पवार, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, शिवसेनेचे नेते आदित्य ठाकरे यांनीदेखील नाना काटेंच्या प्रचारासाठी चिंचवडमध्ये हजेरी लावली होती. आता महाविकास आघाडीचे उमेदवार वंचितचा पाठिंबा मागत आहे.

महाविकास आघाडीने उमेदवारी न दिल्याने राहुल कलाटे यांनी बंडखोरीचा निर्णय घेतला. अनेक नेत्यांनी उमेदवारी अर्ज मागे घेण्यासाठी विनंती केल्यानंतरही राहुल कलाटे निवडणूक लढवण्यावर ठाम होते. ते चिंचवडमध्ये आता शिट्टी या चिन्हावर निवडणूक लढवणार आहे. २०१९ च्या निवडणुकीत राहुल कलाटे यांना नाना काटे यांच्यापेक्षा जास्त मतं पडले होते. त्यामुळे महाविकास आघाडीचं टेन्शन वाढलं आहे.

# सीबीएसई बोर्डाच्या दहावी आणि बारावीच्या परीक्षा आजपासून सुरू

## ३८ लाखांहून अधिक विद्यार्थी परीक्षा देणार

**पुणे : प्रतिनिधी**



केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळाकडून घेण्यात येणाऱ्या दहावी आणि बारावी बोर्डाच्या परीक्षा उद्यापासून म्हणजे १५ फेब्रुवारीपासून सुरू होणार आहेत. सीबीएसई बोर्डाच्या या परीक्षा ५ एप्रिलपर्यंत चालणार आहेत. यंदा ३८ लाख ८३ हजार ७१० विद्यार्थी बोर्डाच्या परीक्षेला बसणार आहेत. बोर्डाची परीक्षा सकाळी १०.३० ते दुपारी १.३० या वेळेत घेण्यात येईल.

सीबीएसईने जारी केलेल्या नोटिसनुसार, यावर्षी ३८ लाखांहून अधिक विद्यार्थी बोर्डाच्या परीक्षेला बसणार आहेत. त्यापैकी २१ लाख ८६ हजार ९४० विद्यार्थी दहावीची परीक्षा देणार आहेत. तर १६ लाख ९६ हजार ७७० विद्यार्थी बारावीच्या परीक्षेला बसणार आहेत. सीबीएसईने बोर्डाच्या परीक्षांसाठी देशात आणि परदेशात ७ हजार २५० हून अधिक परीक्षा केंद्रे स्थापन केली आहेत. १०वीची परीक्षा १६ दिवसांत संपणार आहे तर बारावीच्या परीक्षेला ३६ दिवस लागतील.

इयत्ता दहावीची परीक्षा ७६ विषयांसाठी घेतली जाईल आणि इयत्ता बारावीची परीक्षा एकूण ११५ विषयांसाठी घेतली जाईल. दहावीच्या परीक्षेसाठी एकूण ७२४० केंद्रे स्थापन करण्यात आल्याचे बोर्डाने सांगितले आहे. तर बारावीच्या परीक्षेसाठी ६७५९ केंद्रांचे नियोजन करण्यात आलं आहे.

विद्यार्थ्यांच्या संख्येबद्दल बोलायचे झाले तर, दहावी बोर्डाच्या परीक्षेसाठी एकूण १२ लाख ४७ हजार ३६४ मुले आणि ९ लाख ३८ हजार ५६६ मुली बसतील. तर बारावीच्या परीक्षेत ९ लाख ५१ हजार ३३२ मुले आणि ७ लाख ४५ हजार ४३३ मुली परीक्षा देणार आहेत.

सीबीएसई बोर्डाने नोटीसमध्ये म्हटलं आहे की, परीक्षा केंद्रांवरून मिळालेल्या माहितीनुसार सर्व केंद्रांनी तयारी पूर्ण केली आहे. विद्यार्थी तणावाशिवाय परीक्षेला बसू शकतात आणि चांगली तयारी करू शकतात. हे लक्षात घेऊन सीबीएसईने वेळापत्रक तयार केलं आहे.

**महाराष्ट्र बोर्डची बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारीपासून सुरू**

राज्य शिक्षण मंडळाकडून दहावी आणि बारावीच्या परीक्षांचे अंतिम वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. त्यानुसार बारावीची लेखी परीक्षा २१ फेब्रुवारी २०२३ ते २१ मार्च २०२३ तर दहावीची लेखी परीक्षा २ मार्च २०२३ ते २५ मार्च २०२३ या कालवधीत होणार आहे. राज्य मंडळाच्या दहावी-बारावी बोर्ड परीक्षेत कॉपीला आळा घालण्यासाठी परीक्षा केंद्राजवळील झेरॉक्स दुकाने बंद ठेवली जाणार आहेत.

# पुण्यातील कसबा पोटनिवडणुकीत भाजपला मनसेची साथ

**पुणे : प्रतिनिधी**

पुण्यातील कसबा विधानसभा पोटनिवडणुकीसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने भाजपला पाठींबा दिला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी याबाबतची भूमीका जाहीर केल्याची माहिती मनसे नेते बाबू वागस्कर यांनी दिली. ''हिंदुत्व आणि विकास हे दोन्ही मुद्दे प्रभावशाली पद्धतीने पुढे नेणारा एकच घटक सध्या आहे, तो म्हणजे भारतीय जनता पक्ष. त्यामुळेच पुण्यातील कसबा विधानसभा मतदारसंघात भारतीय जनता पक्षाला पूर्ण सक्रिय पाठिंबा देण्याचा निर्णय मी घेत आहे, असे राज ठाकरे यांनी म्हटले असल्याचे वागस्कर यांनी सांगितले.

पुण्यातील मनसे नेत्यांनी आज राज ठाकरे यांची मुंबईत भेट घेतली. त्यावेळी पुण्यातील कसबा विधानसभा पोट निवडणुकीसंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी बाबू वागस्कर, अजय मोरे, किशोर शिंदे आदी मनसेचे पुण्यातील स्थानिक नेते उपस्थित होते.

कसबा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मुक्ताताई टिळक यांचे निधन झाल्यामुळे या मतदारसंघात निवडणूक होत आहे. त्यामध्ये भारतीय जनता पक्ष, बाळासाहेबांची शिवसेना आणि मित्र पक्षाच्या युतीतर्फे हेमंत रासने हे उमेदवार म्हणून रिंगणात आहेत. या संदर्भात मनसेची भूमिका अद्याप स्पष्ट करण्यात आली नव्हती. या पार्श्वभूमीवर पुण्यातील स्थानिक नेत्यांनी राज यांची आज भेट घेतली. हिंदुत्व आणि विकास याच्या बाजूनेच आपला कल असल्याचे राज ठाकरे यांनी यावेळी स्पष्ट केले. त्यामुळे कसबा विधानसभा निवडणुकीत भाजप युतीचे उमेदवार हेमंत रासने यांना बळ मिळाल्याचे बोलले जात आहे.

निवडणूक प्रमुख आमदार माधुरी मिसाळ आणि भाजपचे प्रदेश सरचिटणीस मुरलीधर मोहोळ यांनी आज मनसेचे प्रवक्ते आणि नेते अनिल शिदोरे प्रदेश, नेते बाबू वागस्कर, उपाध्यक्ष बाळा शेंडगे, प्रदेश सरचिटणीस किशोर शिंदे, शहर अध्यक्ष साईनाथ बाबर आणि कसबा विभागाचे अध्यक्ष गणेश भोकरे यांची भेट घेतली. यावेळी वागस्कर यांनी पाठिंबा दिल्याचे जाहीर केले.

दिवंगत आमदार मुक्ता टिळकांच्या रिक्त झालेल्या जागेवर ही कसब्यात निवडणूक होत आहे. त्यामुळे कसब्यातून टिळक कुटुंबीयांना उमेदवारी मिळण्याची शक्यता होती. मात्र ती उमेदवारी भाजपच्या हेमंत रासने यांना देण्यात आली. तर महाविकास आघाडीकहून काँग्रेसच्या रविंद्र धंगेकर यांना उदेवारी देण्यात आली. त्यामुळे आता हेमंत रासने विरूद्ध रविंद्र धंगेकर यांच्यात लढत होणार आहे.

## राज्यातील वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

**मुंबई :** राज्यातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून राजेंद्र भोसले यांची मुंबई उपनगरच्या जिल्हाधिकारी पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. तर मुंबई उपनगरच्या जिल्हाधिकारी निधी चौधरी यांची मुंबईतील विक्रीकर खात्याच्या सह-आयुक्तपदी बदली करण्यात आली आहे. तसेच दिपा मुधोळ-मुंडे यांची बीडच्या जिल्हाधिकारीपदी बदली करण्यात आली आहे.

# चारित्र्याच्या संशयावरून पत्नीवर लोखंडी रॉडने वार; पत्नीला १४ टाके, पती अटकेत

**पुणे : प्रतिनिधी**

विभक्त राहणाऱ्या पत्नीवर पतीने संशय घेत तिच्यावर लोखंडी शस्त्राने वार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पुण्यातील बालेवाडी परिसरात ही घटना घडली आहे. यात पत्नी गंभीर जखमी झाली असून तिला १४ टाके पडले आहेत. पत्नीवर खासगी रुग्णालयात उपचार सुरु आहेत. प्रकरणी चतु:श्रृंगी पोलिसांनी पतीविरुद्ध गुन्हा दाखल करुन त्याला अटक केली आहे.

घडलेल्या या प्रकरणी ३० वर्षीय पत्नीने पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार पती गणेश डिंबळे या ३७ वर्षीय व्यक्तीला पोलिसांनी अटक केली आहे. ही संपूर्ण घटना काल (१३ फेब्रुवारी)ला संध्याकाळी पाचच्या सुमारास घडली आहे. दोघांचे बारा वर्षापूर्वी विवाह झाला होता. त्यांना दोन मुली आहे. काही वर्षांपूर्वी त्यांच्यात वादावादी झाली होती. त्यामुळे ते दोघे विभक्त राहत राहतात. तक्रारदार या एका टॅव्हल्स कंपनीत कामाला आहेत. आरोपी गणेश हा पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत होता. यामुळे त्यांच्या वाद सुरू होते. सोमवारी सायंकाळी तो पत्नी काम करत असलेल्या परिसरात आला होता. त्यावेळी पत्नी ऑफिसमधील सहकाऱ्यासोबत चहा पिण्यासाठी ऑफिस जवळील चौकात आल्या होत्या. हे सगळं पती गणेश यांनी पाहिलं. पत्नीसोबत असलेल्या त्यांच्या सहकाऱ्याला शिवीगाळ करुन पत्नीच्या मानेवर, डोक्यावर लोखंडी शस्त्राने वार केले. त्यावेळी संबंधित सहकाऱ्यालाही आरोपी गणेश याने जीवे मारण्याची धमकी दिली.

या सगळ्या हल्ल्यात पत्नी जखमी झाली. तिच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहे. त्यानंतर पत्नीने पोलिसांत धाव घेतली. पोलिसांनी गणेश याच्या विरुद्ध खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करून त्याला अटक केली आहे.

# कणेरी मठात पर्यावरणाचा जागर अन् व्यवसाय, उद्योगाला स्टार्टअप्

## सुमंगल लोकोत्सवात विक्रीसाठी तब्बल हजारांवर स्टॉल

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

पर्यावरण जागृतीचा जागर, सेंद्रिय शेतीचा प्रचार, पंचमहाभुतांच्या महतीचे सादरीकरण, स्वास्थ, शिक्षण आणि कृषी यांच्या आधुनिकीकरणासाठी दिली जाणारी माहिती याबरोबरच छोट्या-मोठ्या उद्योजक, व्यावसायिकांना आपला व्यवसाय व उद्योग वाढीसाठी मोठे व्यासपीठ 'सुमंगलम लोकोत्सवा'च्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आले आहे. यासाठी तब्बल हजारावर स्टॉल उभारण्यात आले आहेत. शिवाय दहा हजारांवर व्यावसायिकांचे संमेलन होणार असून त्यांच्या अनुभवाची शिदोरीच नवउद्योजकांना मिळणार आहे.

पूज्य श्री काडसिद्धेश्वर स्वामीजी यांच्या मार्गदर्शनाखाली कणेरी मठ येथे २० ते २६ फेब्रुवारी दरम्यान 'सुमंगलम् पंचमहाभूत लोकोत्सव' होत आहे. त्याची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री दीपक केसरकर यांनी तयारीची पाहणी केली. अतिशय चांगली तयारी सुरू असल्याबद्दल समाधान व्यक्त करतानाच त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांना काही सूचनाही दिल्या. यामुळे नियोजनाला आणखी गती आली आहे. पृथ्वी, वायू, अग्नी, जल आणि आकाश या पंचमहाभूतांची गॅलरी उभारण्याचे काम पूर्णत्वाकडे आले आहे. सहाशे मूर्तींचा वापर करत सोळा संस्कार दाखविण्यात आले आहेत. तेही काम पूर्ण झाले आहे.

**शेतकऱ्यांच्या वस्तूंना मोठी बाजारपेठ येथे उपलब्ध होणार आहे. यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांपासून ते उद्योजक, व्यावसायिकांना त्यांच्या व्यवसाय वृध्दीसाठी हा महोत्सव पर्वणी ठरणार आहे.**

**– राजू लिंग्रज, सदस्य, संयोजन समिती**



पारंपरिक ग्रामीण समाजाला वैज्ञानिक दृष्टीकोन आणि आधुनिक कार्यपद्धतीची माहिती या लोकोत्सवातून देण्यात येणार आहे. पर्यावरण जागृतीबरोबरच युवकांसह सर्वांनाच उद्योग क्षेत्रात करिअर करण्यासाठी अनेक स्टार्टअप प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात येणार आहेत. यासाठी दहा हजारावर व्यावसायिकांचे संमेलन होणार आहे. देशभरातील अनेक उद्योजक यामध्ये सहभागी होणार आहेत. उद्योग, व्यवसाय कसा वाढवावा याबाबत ते मार्गदर्शन करणार आहेत.

**शेतकरी आणि सर्वसामान्य व्यावसायिकांना त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी मोठी बाजारपेठ लोकोत्सवाच्या निमित्ताने उपलब्ध होणार आहे. यामुळे यामध्ये सहभागी होणाऱ्या शेतकरी आणि व्यावसायिकांना मोठी पर्वणी मिळणार आहे. जनजागृतीबरोबरच व्यवसायवृध्दीसाठी उपलब्ध करून दिलेली ही संधी आहे.**

**– प्रताप कोंडेकर, सदस्य, संयोजन समिती**

सामान्य शेतकरी, व्यावसायिकपासून ते प्रथितयश उद्योजकांनाही त्यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी मोठे व्यासपीठ या निमित्ताने उपलब्ध करून देण्यात आले आहे. शेती औजारे व इतर उत्पादनांच्या विक्रीसाठी तब्बल हजारावर स्टॉल उभारण्यात आले आहेत. सर्वसामान्य शेतकऱ्यांना उपयोगी पडतील असे छोटी छोटी औजारे येथे उपलब्ध असतील. बियाणांचे स्टॉलही उपलब्ध आहेत. सेंद्रिय शेतीसाठी लागणाऱ्या सर्व वस्तू याशिवाय पर्यावरणपूरक वस्तूही येथेही मिळतील. शेतकरी आणि उदयोजकांना राज्य सरकारच्या योजनांची, अनुदानाची माहिती मिळावी म्हणून पन्नास पेक्षा अधिक स्टॉल आहेत. आद्योगिक प्रकल्पांची माहिती देण्यासाठी 'एमआयडीसी हब' उभारण्यात आले आहे. युवकांना उद्योग क्षेत्रातील नवनव्या संशोधनाची माहिती मिळावी म्हणून विशेष सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अनेक मोठमोठ्या कंपन्या यामध्ये सहभागी होणार आहेत.

रोज चार ते पाच लाख लोक या महोत्सवात सहभागी होणार आहेत. यामुळे उत्पादनांना मोठा ग्राहकवर्ग मिळणार आहे. बचत गटाच्या महिलांनाही त्यांच्या वस्तू आणि उत्पादनांच्या विक्रीची सोय करून देण्यात आली आहे.

# नातेपुते नगरपंचायतीच्या १७ कोटी ७५ लाखांच्या कामाचा विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या हस्ते शुभारंभ

## कामे दर्जेदार करण्याच्या आ.मोहिते-पाटील व आ.सातपुते यांच्या सूचना

**नातेपुते : प्रतिनिधी**

नातेपुते गावच्या विकासासाठी आ.रणजितसिंह मोहिते पाटील व आ.राम सातपुते यांनी नातेपुते नगरपंचायतीस १७ कोटी ७५ लाखाचा निधी दिला असुन या कामाचा शुभारंभ माजी उपमुख्यमंत्री विजयसिंहराव मोहिते पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आला.यावेळी आ.रणजितसिंह मोहिते पाटील व आ.राम सातपुते यांनी या निधीतुन गावात दर्जेदार कामे करण्याच्या सुचना दिल्या.

यावेळी आ.रणजितसिंह मोहिते पाटील म्हणाले, नातेपुते नगरपंचायत कामगार भरती समायोजन प्रस्ताव पाठविला असून वीस कर्मचाऱ्यांचे समायोजन होईल तिसऱ्या व चौथ्या सर्वांनीच कर्मचाऱ्यांचा आकृती बंद असल्यामुळे मी व आमदार रामभाऊ सातपुते प्रयत्न करेन. नातेपुतेचे पाणीपुरवठा योजना एकशे बारा कोटी रुपयांचा असून अकलूज नगरपरीषद २५० कोटी ड्रेनेज व पाणीपुरवठ्याचा प्रस्ताव मंत्रालयात पोहोचला आहे. खर्च कमी व उत्पन्न वाढेल या गोष्टीकडे आपणास लक्ष द्यावे लागेल. डांबरीकरणाचा रस्ता फोडल्यास रनिंग स्केवर फुटला पाच हजार रुपये भरावे लागणार आहेत. गावातील बांधण्यात येणाऱ्या शौचालयाची नेहमी स्वच्छता ठेवा. स्वच्छता असेल तरच आरोग्य चांगले राहते. नातेपुते माळशिरस बस स्थानके बी.ओ.टी तत्त्वावर बांधण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्याचप्रमाणे २१ तारखेपर्यंत वीज वितरण ची असणारी थकबाकी ३ एचपी ला ३ हजार रुपये या प्रमाणे भरावे असे त्यांनी सांगितले.

आ. राम सातपुते म्हणाले, अकलूज नंतरची नातेपुते ही मोठी बाजारपेठ असून सातारा, सोलापूर, पुणे या जिल्ह्यातील लोकांचे नातेपुतेशी संबंध असतात. नातेपुतेचे विकासासाठी आम्ही प्रयत्न करतोय. राज्याच्या तिजोरीच्या चाव्या देवेंद्र फडणीस यांच्याकडे आहेत. मिळालेले निधीतून दर्जेदार कामे करावेत. सामान्य जनतेचा पैसा आहे तो सदउपयोगी लागावा. तालुक्याचा चारी बाजूने विकास व ही भूमिका असून मागील अडीच वर्षात फुटकी कवडी दिली नाही. आम्ही १७ कोटी ७५ लाख रुपये दिले कोणाच्या मागे उभे राहायचे हे तुम्ही ठरवा. भाजप सरकारने तुम्हाला निधी दिला असून या रूपाने तुम्ही त्यांचा मतरूपी हिशोब चुकता करावा असे ते म्हणाले.विजयदादांची कृष्णा भीमा स्थिरकरण योजनेचा फायदा सर्वांना होणार आहे त्यासाठी लवकरच योजना मार्गी लागेल. विकासासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे .नातेपुते बस स्थानकाचे लवकर डांबरीकरण होणार आहे येणाऱ्या निधीचा सदुपयोग करून तो शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवा असेही ते म्हणाले.




बाबाराजे देशमुख म्हणाले, नातेपुते ला पहिल्यांदाच एका वेळेस एवढा निधी आला आहे. पूर्वी विजयसिंह मोहिते पाटील मंत्रिमंडळत असताना कोणतेही काम सहजासहजी व्हायचं. मधल्या कालखंडात स्वनिधी उभा करून कामे ग्रामपंचायतला काम करावे लागले. निधी अभावी काम करणे अडचणीचे होते.आता दोन्ही आमदारांच्या प्रयत्नामुळे निधी मिळाल्यामुळे कामे करणे सोपे जाऊ लागले आहे. खऱ्या अर्थाने विजयसिंह मोहिते पाटील यांच्यामुळे निरादेवधर प्रकल्प माळशिरस तालुक्यात आला. आळंदी - पंढरपूर रोडवर नातेपतेत डिव्हायडरवरती स्टेट लाईट द्यावी तसेच नातेपुते मधून जाणारा पालखी मार्ग दोन्ही बाजूला ५५ फूट व दोन्ही बाजुला गटारी व्हाव्यात. नातेपुते ला गावठाण नाही. गायरान गावठाण म्हणून मिळावे अशी मागणी केली

नगराध्यक्ष उत्कर्षाराणी पलंगे, उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख व माजी पंचायत समिती सदस्य माऊली पाटील यांनीहि आपले विचार व्यक्त केले.

यावेळी माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, आ. रणजितसिंह मोहिते पाटील, आ. राम सातपुते,माजी जि प उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख, अक्षय शिक्षण संस्थेचे चेअरमन रघुनाथ कवितके, अकलूज कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे, पंचायत समितीचे माजी सदस्य माऊली पाटील, नगराध्यक्ष उत्कर्षाराणी पलंगे, उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख, बांधकाम सभापती अतुल पाटील,माजी ग्रा. सदस्य बाळासाहेब काळे,उद्योगपती अतुल बावकर,नगरसेवक अविनाश दोशी, रणजित पांढरे अण्णासाहेब पांढरे ,भैय्या सोरटे ,अनिता लांडगे,माजी ग्रामपंचायत सदस्य रणवीर देशमुख ,शक्ति पलंगे व मुख्य कार्यकारी अधिकारी माधव खांडेकर उपस्थित होते.

# पद्मश्री नामदेव ढसाळ पुरस्कार वितरण संपन्न

**राजगुरूनगर : प्रतिनिधी**

समाजात घडत असलेल्या घटनावर, अन्यायी व्यवस्थेविरुद्ध , शोषण,समाज विघातक गोष्टी विरूद्ध साहित्यिक यांनी बाजू मांडली पाहिजे ,समाज हिताच्या गोष्टी साठी त्यांनी भूमिका घेऊन लिहिले पाहिजे, असे प्रतिपादन अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी केले.



महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा राजगुरुनगर आयोजित पद्मश्री नामदेव ढसाळ पुरस्कार वितरण कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.

मागील दोन वर्षांच्या साहित्य पुरस्कार मध्ये डॉ.सुभाष वाघमारे सातारा ,लक्ष्मण महाडिक नाशिक,संदीप धावडे अमरावती ,उत्तम सावंत सांगली,सौ. माधुरी विधाटे चिंचवड,सौ .संजीवनी बोकील पुणे, आबा पाटील बेळगाव, श्रीकांत ढेरंगे संगमनेर, प्रवीण पवार धुळे, सौ मनीषा पाटील सांगली,यांच्या कविता संग्रहाना पद्मश्री नामदेव ढसाळ काव्य प्रतिभा पुरस्कारानी सन्मानित करण्यात आले. तसेच पालघरचे निलेश बाळाराम पाटील यांना स्व. नारायण मेघाजी लोखंडे कामगार भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी कवी विजय चव्हाण लिखित समता या काव्यसंग्रहाचे उपस्थितांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. पुरस्कार प्राप्त कवींच्या कवितांना प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली.

यावेळी व्यापीठावर म. सा. प.जिल्हा प्रतिनिधी राजन लाखे, अड.सतीश गोरडे,मधुकर गिलबिले,कार्यक्रम मुख्य संयोजक, म. सा. प.राजगुरुनगर अध्यक्ष संतोष गाढवे,कवी विजय चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम संयोजन उपाध्यक्ष सदाशिव आमराळे, कोषाध्यक्ष नंदा भोर, बाबाजी शिंदे,प्रल्हाद शिंदे,विजय चव्हाण यांनी केले.

प्रास्ताविक संतोष गाढवे, सूत्रसंचालन धर्मराज पवळे तर उपस्थितांचे आभार सतीश गोरडे यांनी मानले.

# जनसुविधा व नागरी सुविधांमधून माळशिरस तालुक्यासाठी २ कोटी २१ लाख ७० हजार रुपये मंजूर

## आमदार रणजितसिंह मोहिते पाटील व आमदार राम सातपुते यांचे प्रयत्न

**अकलूज : प्रतिनिधी**

जनसुविधा योजनेतून ३४ कामांना १ कोटी ७२ लाख ७० हजार व नागरी सुविधा योजनेतून ८ कामांना ४९ लाख रुपये असे एकूण २ कोटी २१ लाख ७० हजार प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.



महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार रणजितसिंह मोहिते पाटील व आमदार राम सातपुते यांच्या प्रयत्नांतून जनसुविधा व नागरी सुविधांमधून खालील गावांना विविध कामांसाठी निधी मंजुर करण्यात आला आहे.

जनसुविधा योजनेतून वाघोली ३ कामे ११ लाख २० हजार, वाफेगावं १ काम २ लाख ५० हजार, विठ्ठलवाडी १ काम २ लाख ५० हजार, लवंग २ कामे १२ लाख ५० हजार, यशवंतनगर २ कामे १५ लाख, कोंडबावी १ काम ५ लाख, शिंदेवाडी २ कामे ८ लाख, तांबेवाडी १ काम ३ लाख, इस्लामपूर १ काम ३ लाख, मोरोची १ काम ३ लाख, गिरझणी १ काम ५ लाख, बोडले १ काम ५ लाख, चौडेश्वरवाडी १ काम १० लाख, रेडे १ काम ५ लाख, दहिगाव १ काम ५ लाख, पिरळे १ काम ५ लाख, कन्हेर १ काम ५ लाख, मांडवे १ काम ५ लाख, सदाशिवनगर २ कामे १० लाख, डोंबाळवाडी (कु) १ काम ५ लाख, बागार्डे १ काम ५ लाख, गिरवी १ काम ५ लाख, एकशिव १ काम ५ लाख, मारकडवाडी १ काम ५ लाख, कुरबावी १ काम ५ लाख, कळंबोली १ काम ५ लाख, तामसिदवाडी १ काम ७ लाख, माळीनगर १ काम १० लाख.

नागरी सुविधा योजनेतून बोरगावं १ काम ४ लाख, मांडवे २ कामे १३ लाख, दहिगाव १ काम ४ लाख, तांदूळवाडी १ काम ५ लाख, फोंडशिरस १ काम ५ लाख, यशवंतनगर १ काम १० लाख, संग्रामनगर १ काम ८ लाख अशा तालुक्यातील एकूण ४२ कामांना २ कोटी २१ लाख ७० हजार रुपये कामांना प्रशासकीय मान्यता मिळाल्याची माहिती दिली व उर्वरित प्रस्तावित कामांना दुसऱ्या टप्प्यामध्ये मंजूर होईल, अशी माहिती दिली.

# श्री घाटजाई देवी यात्रा उत्सवानिमित्त वाहतूक मार्गात बदल

**सातारा : प्रतिनिधी**

पाचगणी पोलीस ठाणे हद्दीतील मौजे पाचगणी, ता. महाबळेश्वर गावचे श्री घाटजाई देवी यात्रा उत्सवानिमित्त दिनांक १५ व १६ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३३ (१) (ब) प्रमाणे प्राप्त झालेल्या अधिकारास अनुसरुन दिनांक १५ फेब्रुवारी २०२३ रोजीचे ००.०० वा. पासुन ते दिनांक १६ फेब्रुवारी २०२३ रोजीचे २४ वा. पर्यंत वाहतुक मार्गात खालील प्रमाणे बदल करण्यात येत आहे.

वाहतुकीचा मार्ग पुढीलप्रमाणे : महाबळेश्वर बाजुकडुन वाई बाजुकडे जाणारी वाहतुक : एसटी स्टॅन्ड चौक पाचगणी मार्गे - राहिल प्लाझा- टेबल लॅन्ड कॉर्नर - अपना हॉटेल- भिमनगर - जुने पोलीस ठाणे ते मेन रोड.

वाई बाजुकडुन महाबळेश्वर बाजुकडे जाणारी वाहतुक : डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान - चेसन रोड शॉलम हायस्कुल- न्यू ईरा हायस्कुल मार्गे - रश्मी चौक मेन रोड .

अवडज वाहनासाठी वाहतुक मार्ग वेळ सकाळी ११.०० ते रात्री ००.०० वा पर्यन्त महाबळेश्वर वरुन वाई - पुणे बाजुकडे जाणारी अवजड वाहनांची वाहतुक संजीवर नाका मार्गे करहर-कुडाळा-पाचवड .

महाबळेश्वरकडे जाणारी अवजड वाहनांची वाहतुक पाचवड मार्गे - कुडाळ- करहर - संजीवन नाका महाबळेश्वर अशी करण्यात येत आहे.

तरी वरील नियमांचे उल्लंघन केल्यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३१ अन्वये कारवाईस पात्र राहतील याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

## महाज्योतीच्या विद्यार्थ्यांना जेईई मेन्स परीक्षेत मिळविले घवघवीत यश!

**सातारा :** जेईई मेन्स ही अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी घेण्यात येणारी सर्वात मोठी परीक्षा आहे. देशभरातील आयआयटी आणि इतर प्रतिष्ठित अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी ही परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य आहे. नुकताच या परिक्षेचा निकाल जाहिर झाला आहे आणि यात महाज्योतीतर्फे घेतलेल्या जेईई मेन्स प्रशिक्षण योजनेतील १३ विद्यार्थी ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुणांनी उत्तीर्ण झालेले आहेत.

## धनाजी गायकवाड यांचे निधन

**अकलूज : प्रतिनिधी**



माळशिरस तालुक्यातील तांदुळवाडी येथील धनाजी तानाजी गायकवाड यांचे वयाच्या ३५ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुली असा परिवार आहे. ते पत्रकार डी. एस. गायकवाड यांचे चुलत बंधू होत.

धनाजी गायकवाड यांच्या अंत्ययात्रेस वृत्तपत्र तसेच सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# अकलूज येथे खंडकरी शेतकऱ्यांच्या साखळी उपोषणाचा पहिला दिवस

**अकलूज : प्रतिनिधी**

अकलूज येथील उपविभागीय अधिकारी कार्यालय येथे माळशिरस तालुक्यातील खंडकरी शेतकऱ्यांनी साखळी उपोषण सुरू केला आहे. यावेळी त्यांनी आपल्या मागण्यांबाबत माध्यमांना निवेदन दिले.

यावेळी त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, सदाशिवनगर मळा खंडकऱ्यांच्या मागण्या शिवपूर मळा, श्रीपूर मळा येथील मागणीनुसार शेतकऱ्यांना जमीन मिळावी. ज्यांचा नमुना क्रमांक १ मंजुर झाला आहे त्या शेतकऱ्यांना




त्यांच्या पसंतीची जमीन उपलब्ध करून द्यावी. खंडकऱ्यांना ज्या जमिनी मिळालेल्या आहेत त्या वर्ग दोन च्या आहेत. त्या जमिनी वर्ग एक करुन मिळाव्यात. ज्यांना जमिनी मिळाल्या आहेत त्यांची मोजणी व गटाची फाळणी करून हद्दी खुना करून द्यावी. गेल्या दहा वर्षापासून प्रलंबित असलेल्या खंडकरी यांच्या बाबतीत तातडीने कार्यवाही व्हावी. ज्यांची जमीन एकरच्या पेक्षा कमी गेली आहे ती त्या खंडकऱ्यांना एकर द्यावी. खंडकरी जमिनी वाटप करताना त्यांना पाटपाणी व रस्ता द्यावा. ज्या जमिनीतून चारी किंवा रस्ता गेला आहे ते क्षेत्र वगळून जमिनी वाटप करून द्याव्यात. माळशिरस तालुक्यात खंडकरी शेतकऱ्यांना ज्यांच्या जमिनी वाटप करायचे राहिलेले आहेत त्यांच्यासाठी अनुभवी प्रांताधिकारी किंवा फक्त खंडकरी प्रश्नासाठी स्वतंत्र अधिकारी नेमावा. ०२ ऑक्टोबर १९७५ प्रमाणे युनिट धरून जमीन वाटप व हदद् खुना करून मिळावी. औरंगाबाद खंडपीठाच्या निर्णयानुसार (स्टे) प्रलंबित खंडकरी शेतकऱ्यांना जमीन वाटप होईपर्यंत संयुक्त शेतीस भाडेतत्वावर जमिनी देऊ नयेत व त्यात कुठल्याही प्रकारचा हस्तक्षेप करू नये. २०१२ पासून जमीन वाटपापासून वंचीत राहिलेल्या खंडकरी वारसांना म.रा.शे.म. यांनी संयुक्त शेतीसाठी भाडे तत्वावर दिलेल्या दराप्रमाणे जमीन मिळेपर्यंतची नुकसान भरपाई मिळावी, या मागण्या प्रशासनाकडे करण्यात आल्या आहेत.

# स्नेहसंमेलन आनंद मेळाव्याचे चौथे वर्षे उत्साहात संपन्न

**राजगुरूनगर : प्रतिनिधी**

जवाहर विद्यालय चास येथील १९८८ / ८९ व ८९ / ९० या दोन बॅचचा एकत्रितरित्या स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम पवना डॅम येथील ग्रीन फॉरेस्ट रिसॉर्ट येथे रविवार, दिनांक १२ फेब्रुवारी या दिवशी उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचे आयोजक उद्योजक संदीप मुळूक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान सुरेश कोबल व बाळासाहेब राऊत यांनी भूषविले. अतिशय आनंदी व उत्साहवर्धक वातावरणामध्ये हा



स्नेहमेळावा संपन्न झाला. सध्याच्या धकाधकीच्या जगातून थोडंसं दूर ताणतणाव दूर करण्यासाठी अशा कार्यक्रमांची आवश्यकता असते आणि म्हणूनच या कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देण्यात आला वर्गात शिकवणारे शिक्षकांचे काही अनुभव सांगितले प्रत्येक विद्यार्थ्याने आपला परिचय करून देऊन आपल्या बाबतीत घडलेले विनोदी किस्से सांगितले. बरेच मित्र मैत्रिणी अनेक वर्षांनी भेटले होते त्यामुळे त्यांचे अंतकरण भरून आलं होतं आणि खरोखरच आयोजकांनी हा आनंददायी आनंदाचा मंगलमय सोहळा आम्हा सर्वांना उपलब्ध करून दिला याबद्दल प्रत्येक जण एकमेकांचे ऋण व्यक्त करत होता कार्यक्रम प्रसंगी अँडव्होकेट अरुण मुळूक तसेच उद्योजक विलास राक्षे बाळासाहेब रासकर रोहिदास मुळुक यांनी आपली मनोगत व्यक्त केली.

पोलीस हवालदार नामदेव बोकड व महेश झनकर सुनील चौरे हनुमंत ढमढेरे यांनी देखील स्नेह मेळाव्या निमित्त आपले विचार मांडले व नक्कीच या कार्यक्रमातून आम्ही शंभर टक्के ऊर्जा घेऊन जाऊ यात काही शंका नाही असा मनोदय व माणस त्या ठिकाणी व्यक्त केला तसेच राजेंद्र साळवे यांचा गीत बहार हा मनोरंजनाचा कार्यक्रम देखील त्या ठिकाणी संपन्न झाला स्नेहसंमेलन कार्यक्रमासाठी बहुसंख्येने मुले आणि मुली उपस्थित होत्या बहुतेक जण पुणे मुंबई राजगुरुनगर नारायणगाव शिरूर या ठिकाणावरून उपस्थित राहिले होते खरोखर संपूर्ण दिवसाचे नियोजन आणि आयोजन सर्वच विद्यार्थी आयोजकांनी अगदी चांगल्या प्रकारे व व्यवस्थित पार पाडले म्हणून सर्वच मित्र परिवाराचे अगदी मनस्वी आभार कार्यक्रमाचे निवेदन राजेंद्र नाईकरे यांनी केले तर आभार अर्चना कुलकर्णी यांनी मानले.

# शिवार्पणम.. या बहारदार शास्त्रीय भरतनाट्यमच्या अदाकारीने सातारकर मंत्रमुग्ध



**सातारा : प्रतिनिधी**

येथील श्री उत्तर चिदंबरम नटराज मंदिराच्या महाशिवरात्री महोत्सव -२०२३ मध्ये महोत्सवात शिवार्पणम ..या पुणे येथील पदन्यास नृत्यालयाच्या वतीने सादर करण्यात आलेल्या बहारदार भरतनाट्य नृत्य आणि सातारकर प्रेक्षकांची मने जिंकली .गुरु सौ. सपना सास्ताकार यांच्या प्रभावी मार्गदर्शनाखाली सादर झालेल्या या नृत्य कार्यक्रमाचा प्रारंभ कलाकारांनी करण्यापूर्वी गुरु सौ .सपना सस्ताकार यांनी भगवान शिव व नटराज्याचे आशीर्वाद मिळावे यासाठी श्लोकांमधून नृत्य वंदना केली.

त्यानंतर पुष्पांजली सादर करताना देव ,गुरु, उपस्थित प्रेक्षक मंडळी यांना अभिवादन करणारी रचना नाटय रागात आदि तालात श्रुती कुलकर्णी यांनी बहारदारपणे सादर केली. कळीचे फुलात रूपांतर होत जाणाऱ्या अविर्भावा प्रमाणे आलरिपू हा नृत्य प्रकार मिश्रचापुत प्राजक्ता काकडे यांनी सादर केला .शुद्ध नर्तन प्रकारातील जतिस्वरम हा नृत्य प्रकार आरुषी आपटे यांनी रागमालिका रागात मिश्रा चापूत पदलालित्य आणि अभिनय यातून साकारला. भगवान शंकराची शिवस्तुती श्रुती कुलकर्णी यांनी पुन्हा एकदा अतिशय बहारदार नाट्य अभिनय व पदल आली त्यातून सादर करताना भगवान शिवाला केलेले नमन खरोखरच उपस्थितांना अचंबित करणारे ठरले भरत नाट्यम मधील वर्ण या शुद्ध शास्त्रीय नृत्य प्रकारात सादर झालेली रचना ही भगवान शिवावर भक्ताने स्तुतीमध्ये अतिशय सुरेख नृत्यविष्कार आरुषी ,मृणाल, प्राजक्ता आणि निमिषा यांनी साकारली .. अये स्वये शिवलीला वर्णती.. या मराठी पदावर शिव कीर्तन सादर करण्यात आले आणि भगवान शंकराचा निस्सीम भक्त असणाऱ्या रावणाने रचलेले शिवतांडव स्तोत्रांवर मृणाल यादव चा अविष्कार खूपच बहारदार सादर झाला.

नृत्यप्रकार तिल्लाना कदन कुतूहलम रागात सादर करताना मानसी भोसले ने आपल्या नृत्य साधनेची ओळखच उपस्थित त्यांना करून दिली. गुरु कल्पना सास्ताकार यांचे सह प्राजक्ता काकडे, मृणाल यादव, आरुषी आपटे, श्रुती कुलकर्णी ,मानसी भोसले, आणि निमिषा नायर या सर्व कलाकारांचा सत्कार मंदिराच्या महोत्सवाच्या संयोजिका सौ. उषा शानभाग व सौ .जयश्री शिंदे यांचे हस्ते करण्यात आला .कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार अतुल देशपांडे यांनी केले. नारायणराव,रमेश हलगेकर, वासुदेव नायर मंदिराचे व्यवस्थापक चंद्रशेखरन आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्य *संपादक : राही भिडे, हे दैनिक राजदंड मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राणे प्रकाशन प्रा. लि., सर्व्हे नं. १२९, हिस्सा नं. ११ / २ आणि १ / १३, वारजे पुणे - ४११ ०५८ येथे मुद्रित करून न्याती ग्रँडीयर, १०२ ग्रीनविच, कडनगर, उंड्री, पुणे -४११ ०६० येथून प्रकाशित केले. दैनिक राजदंडमधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी) दूरध्वनी : पुणे (०२०)२६९०९०३१, इमेल-rajdand.pune@gmail.com
या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या लेख, बातम्या, जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयीन कक्षेत सोडविले जातील. Declaration No. : SDM/SR/07/2023

# कोरेगाव बचाव समितीच्या मागण्या शासनास ऐकण्यास भाग पाडू - आ. शशिकांत शिंदे

## गैरहजर अधिकाऱ्यांवर हक्कभंग दाखल करणार; सत्ताधारी नगरसेवकांची दांडी

**कोरेगाव : प्रतिनिधी**

कोरेगाव बचाव समितीने विकास आराखड्याबाबत घेतलेली भूमिका येत्या अधिवेशनात मांडून राज्य सरकारला ती ऐकण्यास भाग पाडू असे सांगत आजची बैठक राजकीय नसून ती सर्वपक्षातील बाधित जनतेसाठी होती, त्याला सर्व लोकप्रतिनिधिनी उपस्थित न राहिल्या बद्दल नाराजी व्यक्त करत अनुपस्थित अधिकाऱ्यावर हक्कभंग दाखल करण्याचा इशारा आमदार शशिकांत शिंदे यांनी दिला.

कोरेगाव बचाव समितीच्या वतीने आज पंचायत समितीच्या सभागृहात लोकप्रतिनिधी आणी आराखडा बाधिताची बैठक आयोजित केली होती. त्या बैठकीत ते बोलत होते. याप्रसंगी नगर रचनाकार आर. ए. उथळे, सहाय्यक नगर रचनाकार हर्षली पाटील, बांधकाम विभागाचे अधिकारी श्री. पाटील, भूमापन अधिकारी श्री साठे, नगर पंचायतीचे श्री खरात यांची प्रमुख उपस्थिति होती.

आ. शिंदे पुढे म्हणाले, आजची बैठक राजकीय नव्हती. विकास आराखड्यावर समोरासमोर सविस्तर चर्चा या हेतूने सर्व लोकप्रतिनिधीची बैठक घेतली होती. आरक्षणाचा प्रश्न राजकीय होऊ नये अशी आमची अपेक्षा होती. पण त्यांना लोकांच्या अडचणीशी काही देणे घेणे नाही असे सांगून या बैठकीला जे कोणी अधिकारी पत्र देऊन उपस्थित राहिले नाहीत त्यांच्या विरोधात अधिवेशनात हक्कभंग दाखल करून त्यांना त्याचा अधिकार आणी कार्यक्षेत्र दाखवून देणार असा इशारा दिला.

ते पुढे म्हणाले, विकास आराखडा हा माझ्या काळात झाल्याची बोलले जाते. २०१८ साली शासनाने राज्यातील २१७ तालुका ठिकाणी नगरपंचायती करून त्याठिकाणी विकास आराखडा तयार करण्याचा निर्णय झाला. त्यानुसार सर्वेक्षण झाले. त्यावेळी राजाभाऊ बर्गे नगराध्यक्ष आणी जयवंत पवार उपनगराध्यक्ष होते. मी जर आराखडा केला असता तर माझ्या माणसाच्या जागेवर आरक्षण टाकली असती का? सर्वेक्षण माझ्या काळात झाले पण तो अंतिम कधी झाला आहे हे संबधित अधिकारी सांगतील. एका महिन्यातील हा खेळ आहे. अधिकरी यांना पर्सनल सूचना देऊन आराखडायची प्रक्रिया राबवली गेली आहे. खर तर विकास आराखडा राबवताना लोकांची बैठक घेतली गेली नाही. बैठकीत निर्णय झाला असता तर हा संघर्ष झाला नसता, असे सांगून आ.शिंदे म्हणाले, शहरातून जाणारा सातारा पंढरपूर रस्त्याची रुंदी कमी करताना पूढील वीस वर्षाचा विचार केला नाही. आराखड्यामध्ये रिंगरोड, डम्पिंग ग्राउंड, रस्ता, मैदान, शाळा या विषयावर प्रामुख्याने आक्षेप आहेत. यामध्ये रिंगरोडची गरज आहे का हे दाखवून द्यावे लागेल. शहरातून तिळगंगा नदी गेली आहे. ज्या भागातून रिंगरोड प्रस्तावित केला आहे. त्या भागापर्यंत रस्ते गेलेले आहेत. रिंगरोड साठी जिल्हा परिषद आणी बांधकाम विभागाचे पर्यायी रस्ते आहेत, असे असताना रिंगरोडचा अट्टहास कशासाठी केला जात आहे. आगामी वीस वर्ष्याच्या अनुषंगाने टाकलेली शाळा, मैदान, बगीच्यासाठी शासकीय जागा आरक्षित केल्यास शेतकऱ्यांच्या खासगी जागा वाचनार आहेत. त्यासाठी रिकाम्या असणाऱ्या शासकीय जागाची माहिती घेऊन तसे पर्याय दिले पाहिजेत. हरकतीच्या मुदतीत कागदोपत्री आणी कायदेशीर पुरावे देऊन सक्षम बाजू मांडावी लागेल, नाहीतर सत्ताधारी पावर वापरून ते त्यांना पाहिजे त्या प्रमाणे निर्णय राबवतील, असे सांगून कोरेगाव बचाव संघर्ष समितिच्या लढ्याला माझा पाठिंबा असून येत्या अधिवेशनात त्यांची भूमिका मांडून शासनाला ती ऐकण्यास भाग असे असेही शेवटी आ. शिंदे यांनी सांगितले.



नगर रचनाकार उथळे म्हणाले, आगामी पंचवीस वर्षाची वाढती लोकसंख्यचा विचार करून आरक्षण प्रस्थावित केली आहेत. नगरपंचायत झाल्यानंतर जुना आराखडा रद्द करून सुधारित आराखडा करण्याची प्रक्रिया सुरु झाली. त्यावेळी नकाशा तयार केला. त्यावर हरकती घेतल्या. त्यानंतर दोन वर्षपूर्वी ड्रोनद्वारे सर्वेक्षण करून नकाशा तयार केला. तो सर्टिफाईड करून नगरपंचायतीकडे हँड ओव्हर केला. या आराखड्याच्या सेक्टर १ आणी २ भाग केले आहेत. तेथील आगामी वीस वर्षाच्या वाढणाऱ्या आरक्षण प्रस्तावित केले जातात. प्राध्यान्याने शासकीय जागा आणी नंतर नगरपंचायतीच्या जागा आरक्षित केल्या जातात. त्यांनतर खासगी जागा आरक्षित केल्या जातात असे सांगून ते म्हणाले, आराखडा तयार करताना नगरपंचायतीशी पत्रव्यवहार करून त्यांनी सुचवल्या प्रमाणे आरक्षणें टाकली आहेत. बाधित शेतकऱ्यांनी हरकती द्याव्यात, त्यावर सात सदस्यची कमिटी अहवाल तयार करेल. तो अहवाल नगरपंचायतीकडे सादर केला जाईल. त्यावर नगर पंचायतीची जनरलबॉडी आवश्यक तो बदल करून शासनाकडे पाठवेल त्यानंतर शासनाकडून तो फायनल होऊन येईल तो पर्यत् तो फायनल होणार नाही.

**कोरेगाव बचाव संघर्ष समितीने आयोजित केलेल्या बैठकीस खासदार श्रीनिवास पाटील, खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले, आमदार महेश शिंदे, आमदार शशिकांत शिंदे, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक यांना निमंत्रीत केले होते. मात्र यावेळी आमदार शशिकांत शिंदे आणी राष्ट्रवादीचे नगरसेवक उपस्थित होते. मात्र सत्ताधारी नगर सेवक गैरहजर राहिल्याने सभागृहात अनेकांनी नाराजी व्यक्त होत होती.**

यावेळी प्रतिभा बर्गे, मनोहर बर्गे, दिनेश बर्गे, अमरसिह बर्गे, संजय पिसाळ, डॉ. गणेश होळ, विलासराव बर्गे, हणमंत बर्गे, मनोज येवले यांनी आपल्या आराखडा कसा अन्याय कारक आहे हे सांगून आराखडा रद्द झाला पाहिजे अशी मागणी केली.

बैठकीस जिल्हा परिषदेचे माजी सदस्य किरण बर्गे, ऍड. प्रभाकर बर्गे, सहायक पोलिस निरीक्षक श्री बिराजदार, नगरसेवक हेमंत बर्गे, किशोर बर्गे, प्रीतम बर्गे, सचिन बर्गे, श्री धनवडे, प्रशांत गायकवाड यांच्या सह बाधित शेतकरी उपस्थित होते.

# मायणी परिसरात चोरीचे सत्र सुरूच; दवाखाने व मेडिकल चोरट्यांच्या रडारवर

**मायणी : प्रतिनिधी**

मायणी परिसरात चोरीचे सत्र सुरूच असुन शनिवारी रात्री झालेल्या चोरीच्या घटनेत मेडिकल आणि दवाखाने लक्ष केल्याचे दिसून आले यामध्ये दोन दवाखाने, दोन मेडिकल आणि दोन बंद घरे फोडून ३५ हजार रुपये चोरट्यानी चोरून नेले.

गेल्या महिन्या पूर्वी कलेढोंन येथे ही अशाच प्रकारे चोरट्यानी मेडिकल आणि बंद दुकाने लक्ष केले होते परंतु जास्त काही चोरट्यांच्या हाती लागले नाही, त्यामुळे लोकांनीं ही या बाबत कोणतीही तक्रार पोलिसात दिली नाही.तर निमसोड मध्ये ही अशाच प्रकारे चोऱ्या झाल्याचे निदर्शनास आले होते, परंतु लोकांनी कोणत्याही प्रकारची तक्रार दिली नसल्यामुळे पोलिसांना याचा तपास करता आला नाही.

**कलेढोण, निमसोड व मायणीत झालेल्या चोऱ्या एकाच पद्धतीने केल्या असून चोरटा सीसीटिव्हीत कैद झाला असून लवकरच त्याच्या मुसक्या आवळू.**
**– स.पो.नि. मालोजीराव देशमुख (वडूज पोलीस ठाणे)**

तक्रार न दिल्यामुळे चोरट्याचे मनोबल वाढलेले दिसून आले असून बंद शटरचे कुलूप तोडून चोरी करणे हे प्रत्येक चोरीतील समान घटक आहे. त्यामुळे मायणीच्या चोरीचा उलगडा करण्यासाठी घटनास्थळी डॉगस्कॉड व ठसे तज्ज्ञांना पाचारण करण्यात आले होते. मंगलमूर्ती मेडिकलचे शटरचे कुलूप तोडताना तो चोरटा सी.सी.टी.व्ही.त कैद झाला असून पोलीस त्याचा शोध लवकरच घेतील.

यावेळी घटनास्थळी स.पो. नी. मालोजीराव देशमुख यांनी भेट देऊन पाहणी केली तर पोलीस उपनिरीक्षक शीतल पालेकर यांच्या सह नाना कारंडे व भूषण माने तपास करीत आहेत.

## वाई-पाचगणी रस्त्यावर चालत्या कारने घेतला पेट



**पाचगणी : प्रतिनिधी**

वाई-पाचगणी रस्त्यावर दांडेघर गावानजीक चालत्या कारने पेट घेतल्याने संपूर्ण कार जळून खाक झाली आहे. दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली असून अग्निशमन दलाच्या बंबाच्या सहाय्याने ही आग आटोक्यात आणण्यात आली आहे. गाडीमध्ये मुंबईतील ४ पर्यटक होते.

घटनेची माहिती समजताच पाचगणी पोलीस घटनास्थळी दाखल झाले. शॉर्टसर्किटने कारने पेट घेतला असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. महाबळेश्वरला जाणाऱ्या रस्त्यावर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, यामध्ये कार संपूर्ण जळून खाक झाली आहे.

# वीज वाहक तारेवर वणव्यामुळे झाड पडल्याने कास पठारावरील काही गावे अंधारात

**कास पठार : प्रतिनिधी**

कास पठार जवळील सातारा तालुक्याचे हद्दीतील देवकल गावाजवळ वणवा समाजकंटकांनी लावला होता. वणव्यामुळे देवकल फाट्या जवळील झाडे वीज वाहक तारेवर पडल्यामुळे तारेवर ताण येऊन विजेचे पोल पडल्याने गेल्या दोन दिवसापासून कास पठार परिसरातील पेट्री, अंबानी देवकल, पारंबे, अटाळी या गावातील वीज पुरवठा बंद आहे. वीज पुरवठा बंद असल्याने या परिसरातील ग्रामस्थांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. वीज मंडळाकडून वीजपुरवठा सुरळीत करण्यासाठी युद्ध पातळीवर काम सुरू असून लवकरच वीज पुरवठा सुरू होईल असे सांगण्यात आले आहे.



कास परिसरातील परिसरातील देवकल गावाजवळ काही समाजकंटकांनी वणवा लावला होता. या वणव्यामुळे परिसरातील छोट्या मोठ्या झाडांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. देवकल गावच्या स्टॉपजवळील एक मोठे झाड वीज वाहक तारेवर पडल्यामुळे शेजारील विजेचा पोल पडला त्यामुळे परिसरातील वीजपुरवठा गेल्या दोन दिवसापासून बंद आहे. वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी या परिसरातील वायरमन अतुल सुतार यांच्याकडून युद्ध पातळीवर काम सुरू आहे.

# राज्यपाल कोश्यारी यांचा राजीनामा मंजूर झाल्याने कोरेगावात राष्ट्रवादीकडून पेढे वाटून आनंदोत्सव साजरा

**कोरेगाव : प्रतिनिधी**

तमाम महाराष्ट्रातील तमाम शिवप्रेमी यांच्यासाठी अतिशय आनंदाचा दिवस आहे, ज्या भगतसिंग कोषारींनी एका घटनात्मक पदावर बसलेले असतानासुद्धा तमाम महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणाऱ्या छत्रपती शिवाजीराजे असतील महात्मा ज्योतिराव फुले असतील सावित्रीबाई फुले असतील हा सह महाराष्ट्रातील तमाम युग पुरुषांच्या बाबतीत त्यांनी चुकीच्या पद्धतीने सातत्याने विधाने केली होती. त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या मनात त्यांच्याविषयी तीव्र संतापाची लाट पसरलेली होती, त्यामुळे त्यांनी त्यांच्या पदाचा दिलेला राजीनामा मंजूर झाल्याचे समजतात कोरेगावात राष्ट्रवादीचे माझी युवा जिल्हाध्यक्ष तेजस शिंदे यांच्यासह बहुसंख्य कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी फटाक्यांची आतिषबाजी करून पेढे वाटून आनंद उत्सव साजरा केला.



राज्यपाल हे घटनात्मक पद आहे, घटनेप्रमाणे राज्यकारभार चालतो की नाही हे फक्त पाहणे तसेच घटनेमध्ये घालून दिलेली सर्वधर्मसमभाव या तत्त्वालाच भगतसिंग कोश्यारी यांनी काळं फासल आहे, त्यामुळे महाराष्ट्र मध्ये गेली साडेतीन वर्ष फार मोठी त्यांच्याविषयी नाराज होती उशिरा का होईना पण केंद्रसरकारने तो निर्णय घेतला त्यामुळे सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले असल्याचे प्रतिपादन माजी जिल्हा परिषद अध्यक्ष शिवाजीराव महाडिक यांनी केले.

खरंतर राज्यपाल हे घटनात्मक पद असल्याने त्यांनी मी कोणत्याही पक्षाचे एकतर्फी काम करावयाचे नसते परंतु केवळ त्यांनी एकाच पक्षाच्या कामासाठी जणू काही त्यांची नेमणूक केली असल्याची भावना जनमानसात उमटल्याने त्यांच्याविषयी राज्यभर असंतोष पसरल्याने त्यांनी तात्काळ राजीनामा द्यावा अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेस राष्ट्रीय काँग्रेस उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना यासह असंख्य त्यांनी तात्काळ पदाचा राजीनामा द्यावा अशा संतप्त प्रतिक्रिया उमटत होत्या.

## सैन्य दलातील जवानाने कोरेगाव येथील राहत्या फ्लॅटमध्ये गळफास घेऊन केली आत्महत्या

**कोरेगाव : प्रतिनिधी**

प्रोफेसर कॉलनी कोरेगाव येथे फ्लॅटमध्ये सैन्य दलात असणाऱ्या शहाजी कुंभार (वय वर्ष ३५, मूळ राहणार सिद्धेश्वर कुरोली, तालुका खटाव) यांनी सिलिंग फॅनला ओढणीच्या सहाय्याने गळफास लावून मयत झाला. याप्रकरणी पोलीस पाटील दीपक शंकरराव शिंदे यांनी कोरेगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केले आहे.

प्रोफेसर कॉलनी कोरेगाव येथील गोकर्ण अपार्टमेंटमध्ये पहिल्या मजल्यावर वास्तव्यास असणारे शहाजी कुंभार वय वर्ष ३५ मूळ राहणार सिद्धेश्वर कुरोली तालुका खटाव यांनी सिलिंग फॅनला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची माहिती सागर संभाजी धवन यांनी पोलीस पाटील दीपक शिंदे यांना कळविले.

पोलीस पाटील दीपक शिंदे यांनी कोरेगाव पोलीस ठाण्यात माहिती दिली.

घटनास्थळी स.पो.नि. एस. आर. बिराजदार, हवालदार सचिन साळुंखे पोलीस कॉन्स्टेबल समाधान गाढवे यासह पोरी जवानांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला.

तपास हवालदार गोकुळ हादगे करीत आहेत.

# साताऱ्यात शिवजयंती महोत्सव २०२३ चे आयोजन

**शिवजयंती उत्सव समिती राजधानीच्या वतीने होणार विविध कार्यक्रम - आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांची माहिती**



**सातारा : प्रतिनिधी**

शिवजयंती उत्सव समिती राजधानी सातारा यांच्या वतीने शिवजयंती निमित्त शिवजयंती महोत्सव २०२३चे आयोजन करण्यात आल्याची माहिती आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पत्रकार परिषदेत दिली.

ते पुढे म्हणाले, शिवजयंती महोत्सव निमित्त साताऱ्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. दिनांक १७ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा ते नऊ श्रीमंत छत्रपती प्रताप हायस्कूल येथे ऐतिहासिक शिवकालीन शस्त्र प्रदर्शन, शनिवार दिनांक १८ रोजी किल्ले अजिंक्यतारा येथे सायंकाळी पाच वाजता गड पूजन व श्री मंगळादेवी आरती व मशाल महोत्सव हे कार्यक्रम होणार आहेत १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती निमित्त शहरातून राजवाडा सातारा येथून भव्य शाही मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक २० फेब्रुवारी रोजी वारकरी संत तुकाराम महाराज यांच्या अकरावे वंशज शिरीष महाराज मोरे यांचे गांधी मैदानावर राजवाडा येथे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे तसेच सुंदर देखावे व मिरवणूक स्पर्धा होणार असून प्रथम बक्षीस पंचवीस हजार द्वितीय बक्षीस पंधरा हजार व तिसरे बक्षीस सात हजार रुपये ठेवण्यात आले आहे.

सर्व शिवप्रेमी सातारकरांनी या महोत्सवात सहभागी व्हावे असे आवाहन शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले. यावेळी नगरविकास आघाडीचे पक्षप्रमुख अमोल मोहिते जयवंत भोसले इत्यादी यावेळी उपस्थित होते.

# किसन वीर महाविद्यालयामध्ये एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन

**वाई : प्रतिनिधी**

येथील जनता शिक्षण संस्थेचे किसन वीर महाविद्यालय, वाई आणि भारतीय अंतराळ संशोधन संस्था, भारत सरकार (इसरो) यांच्या स्पेस एप्लीकेशन्स सेंटर (सॅक), अहमदाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दिनांक १७ फेब्रुवारी २०२३ रोजी अवकाश विज्ञान व तंत्रज्ञानातील संधी आणि वर्तमान प्रवाह या विषयावर किसन वीर महाविद्यालयातील भौतिकशास्त्र, संख्याशास्त्र, गणितशास्त्र आणि भूगोल या विभागाच्या वतीने एक दिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेमध्ये सॅक या नामांकित संस्थेतील शास्त्रज्ञ सहभागी होऊन कला, वाणिज्य व विज्ञान शाखेतील पदवी व पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी भारतीय अंतराळ संशोधन विभागांमध्ये असणाऱ्या नोकरीच्या संधीबद्दल माहिती देवून मार्गदर्शन करणार आहेत.

शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रात इसरोच्या संयुक्त विद्यमाने, महाविद्यालयीन स्तरावर, ही पहिलीच कार्यशाळा आयोजित केली आहे.

सदर कार्यशाळेचे उदघाटन जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदरणीय श्री मदन दादा भोसले यांच्या हस्ते होणार आहे.

या कार्यशाळेमध्ये इसरो संस्थेतील शास्त्रज्ञ डॉ. एस. पी. व्यास, श्री राजेंद्र गायकवाड व श्री संतोषकुमार त्रिपाठी हे मार्गदर्शन करणार आहेत.

पहिल्या सत्रातील तज्ञ व्याख्याते डॉ. व्यास हे भारतीय अंतरिक्ष विभागातर्फे प्रक्षेपित अवकाश उपग्रहांच्या माध्यमातून पृथ्वीची निरीक्षणे कशी नोंदवली जातात. या निरीक्षणांच्या आधारे आपत्कालीन व्यवस्थापनासाठी राष्ट्रीय डेटाबेसच्या अंतर्गत नैसर्गिक आपत्तीप्रसंगी जीयूआय आधारित निर्णय समर्थन साधने, नैसर्गिक आपत्तीचे अंतर आणि क्षेत्र मोजमाप, शोध इत्यादींसाठी जीआयएस आधारित उपयुक्तता साधने, मोबाईल ॲप्स, एसएमएस, पोर्टलद्वारे आपत्ती घटना अहवाल, उपभोगत्यांसोबत ऑडिओ/व्हिडिओ लाइव्ह चॅट साधने, इत्यादी विषयांवर मार्गदर्शन करणार आहेत.

दुसऱ्या सत्रास वैज्ञानिक श्री. राजेंद्र गायकवाड हे तज्ज्ञ अतिथी व्याख्याते असतील. श्री. गायकवाड हे विद्यार्थी तसेच शिक्षकांना, अवकाश तंत्रज्ञानाने पृथ्वीची भौगोलिक निरीक्षणे कशी नोंदवली जातात व त्याचे उपयोग उदा. दूरसंचार, प्रसारण, हवामानशास्त्र आणि शोध आणि बचाव कार्ये यांबद्दल माहिती व मार्गदर्शन करणार आहेत.

तिसऱ्या सत्रास वैज्ञानिक श्री. संतोष कुमार त्रिपाठी हे तज्ञ अतिथी मार्गदर्शक असणार आहेत. श्री. त्रिपाठी हे, अप्रत्यक्षरीत्या म्हणजेच उपग्रह, रडार, लीडार इत्यादी वैज्ञानिक उपकरणांच्या आधारे पृथ्वीच्या भूपृष्ठाचा अभ्यास कसा करायचा व त्यासाठी अंतराळ उपयोग केंद्र अहमदाबाद येथे संभाव्य प्रशिक्षणाच्या सुविधा यांबद्दल माहिती व मार्गदर्शन करतील.

# शाहूनगर, गोळीबार, विलासपूर, पिरवाडीचा पाणीप्रश्न कायमचा सुटला

## ▪ आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या पाठपुराव्याला यश; नगरोत्थानमधून ३४ कोटी ३६ लाख निधी

**सातारा : प्रतिनिधी**

त्रिशंकू भागातील समस्या सोडविण्यासाठी नेहमीच अग्रेसर असलेल्या आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अभ्यासपूर्ण पाठपुराव्यामुळे शाहूनगर, गोळीबार मैदान, विलासपूर, संकल्प कॉलनी, पिरवाडी यासह हद्दवाढीत समाविष्ट त्रिशंकू भागाचा पाणीप्रश्न कायमचा सुटला आहे. या सर्वच परिसरासाठी स्वतंत्र, विस्तारित आणि परिपूर्ण नवीन पाणीपुरवठा योजनेला नगरोत्थान योजनेतून प्रशासकीय मान्यता देऊन तब्बल ३४ कोटी ३६ लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. दरम्यान,आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या विशेष प्रयत्नांमुळे या कामासाठी लागणारी ८ कोटी ५९ लाख रुपये लोकवर्गणी सुद्धा नगरपालिके ऐवजी एमजेपीकडून भरण्यात आली असल्याने नागरिकांचा कररुपाने जमा झालेला पैसाही वाचला आहे.



मुंबई येथे आ. शिवेंद्रसिंहराजे यांनी नगरविकास विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ व इतर संबंधित विभागाच्या प्रधान सचिवांची भेट घेऊन शाहूनगर आणि विलासपूरसाठीच्या नवीन पाणीपुरवठा योजनेसंबंधाने सविस्तर चर्चा करून अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी केली होती. शाहूनगर, विलासपूर, पिरवाडी या भागात गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाणीपुरवठा केला जात आहे. लोकसंख्या वाढीमुळे आणि जलवाहिन्या जुन्या आणि जीर्ण झाल्यामुळे या भागातील नागरिकांना कमी दाबाने पाणीपुरवठा होत असे. हि समस्या सोडविण्यासाठी नवीन विस्तारित पाणीपुरवठा योजना कार्यान्वित झाली पाहिजे यासाठी आ. शिवेंद्रसिंहराजेंचा पाठपुरावा सुरु होता. नवीन योजनेला मंजुरी मिळाल्याने आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे. २०५४ सालातील लोकसंख्या गृहीत धरून या योजनेला मंजुरी देण्यात आली असल्याने नागरिकांना मुबलक पाणी मिळणार आहे.

या योजनेसाठी नगरोत्थानमधून ३४ कोटी ३६ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असून या निधीतून कृष्णा नदीवर नवीन जॅकवेल, इंटेक वेल, दाब नलीका, गुरुत्व नलिका, मंगळाई कॉलनी, फॉरेस्ट कॉलनी आणि चारभिंती येथे नवीन तीन पाणीसाठवण टाक्या उभारण्यात येणार आहेत. या योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे शाहूनगर आणि विलासपूर भागात सुमारे ५० किलोमीटर परिसरात पूर्णपणे नवीन जलवाहिन्या टाकून स्वतंत्र आणि नवीन पाणी वितरण व्यवस्था केली जाणार आहे. यामुळे शाहूनगर आणि विलासपूर परिसरातील नागरिकांना मुबलक पाणी मिळणार असून या भागातील नागरिकांनाचा पाणीप्रश्न कायमचा मिटणार आहे. या कामासाठी तब्बल ८ कोटी ५९ लाख रुपये लोकवर्गणी नगर पालिकेला भरावी लागणार होती. मात्र नगरपालिकेच्या तिजोरीवर बोजा पडू नये आणि पर्यायाने नागरिकांचा कररुपी पैसे वाचावा आणि त्यातून इतर विकासकामे मार्गी लागावीत यासाठी आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या मागणीवरून लोकवर्गणीची रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने देण्याचे मंजूर करण्यात आले. त्यामुळे पालिकेचा आणि सातारकरांचा पैसा वाचला आहे. दरम्यान, नवीन पाणीपुरवठा योजनेमुळे शाहूनगर, गोळीबार मैदान, विलासपूर, संकल्प कॉलनी, पिरवाडी यासह हद्दवाढीत समाविष्ट त्रिशंकू भागाचा पाणीप्रश्न कायमचा सुटला असल्याने या भागातील नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# बीबीसीच्या कार्यालयात आयकर विभागाची पाहणी

## मुंबई आणि दिल्लीतील कार्यालयात अधिकारी दाखल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

बीबीसीच्या कार्यालयात प्राप्तिकर विभागाची पाहणी सुरु आहे. मुंबई आणि दिल्लीतील बीबीसी वृत्तसंस्थेच्या कार्यालयात अधिकारी दाखल झाले आहेत. आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांची टीम बीबीसीच्या कार्यालयात दाखल झाली असून त्यांच्याकडून पाहणी सुरु आहे. प्राप्तिकर विभागाचे अधिकारी बीबीसी कार्यालयातील कागदपत्रांची पाहणी करत आहेत. मुंबई आणि दिल्लीतील कार्यालयांमध्ये ही पाहणी सुरु आहे.

सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बीबीसी ऑफिसमध्ये उपस्थित कर्मचाऱ्यांना प्राप्तिकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी फोन वापरण्यास मनाई केली आहे. बीबीसीच्या सर्व कर्मचाऱ्यांना एका खोलीत एकत्र केलं आहे. दरम्यान सध्या आयकर विभागाची टीम कागदपत्रआंची तपासणी करत आहे. एएनआय वृत्तसंस्थेने ट्विट करत ही माहिती दिली आहे.

एएनआय वृत्तसंस्थेने दिलेल्या माहितीनुसार, आयकर अधिकारी आज बीबीसीच्या दिल्ली आणि मुंबई कार्यालयात पोहोचले आहेत. अधिकाऱ्यांकडून बीबीसीच्या वित्त विभागाच्या खात्यातील काही कागदपत्रांची पडताळणी सुरु आहे. आयकर विभागाने विभागाने खाते आणि वित्त विभागातील व्यक्तींचे काही मोबाईल फोन आणि लॅपटॉप/




डेस्कटॉप जप्त केल्याचं सुत्रांच्या माहितीनुसार सांगितलं आहेत. आयकर अधिकारी इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा बॅकअप घेतील आणि त्या व्यक्तींना परत देतील, असंही एएनआयच्या सुत्रांनी सांगितलं आहे.

दरम्यान, यासंदर्भात बीबीसीने निवेदन जारी करत सांगितलं आहे की, 'आज बीबीसीच्या कार्यालयात आयकर विभागाने पाहणी केली. बीबीसीने ट्रान्सफर प्राइसिंग नियमांचे जाणीवपूर्वक पालन न केल्यामुळे प्राप्तिकर विभागाने बीबीसी कार्यालयाची पाहणी केली. आयकर कायद्याच्या तरतुदींनुसार, अधिकाऱ्यांनी केलेल्या पाहणीला 'सर्वेक्षण' असं म्हणतात, छापेमारी नाही. त्यामुळे याबाबत गोंधळ निर्माण होऊ नये.'

# एअर इंडियाला मिळणार नवी उभारी, टाटा सन्स २५० विमाने करणार खरेदी; पंतप्रधान मोदींनी केलं अभिनंदन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

टाटा समूहने आतापर्यंतची सर्वात मोठी विमान वाहतूक डील केली आहे. टाटा सन्स एअरबसकडून २५० विमानं खरेदी करणार आहे. यामध्ये एअर इंडिया ४० अ३५० विमानं आणि २१० मध्यम श्रेणीतील विमानं खरेदी करणार. ज्यात १४० अ३२० आणि ७० अ३२१ विमानं असणार आहे. टाटा सन्सचे अध्यक्ष एन चंद्रशेखरन म्हणाले, ''एअर इंडियाने एअरबसकडून २५० विमाने खरेदी करण्याची घोषणा केली आहे. त्यापैकी ४० वाइड बॉडी विमाने असतील.'' ते म्हणाले की, विमान कंपनी आपला ताफा आणि ऑपरेशन्स वाढवण्याची तयारी करत आहे. टाटा समूहाच्या मालकीखाली आल्यानंतर एअर इंडियाची ही पहिली ऑर्डर असेल.

हा करार केवळ टाटा समूहासाठीच नाही तर भारताच्या विमान वाहतूक बाजारासाठीही अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे. खुद्द पंतप्रधान मोदींनीही त्याचे कौतुक केले आहे. येत्या दीड दशकात भारताला २,००० हून अधिक विमानांची गरज भासेल, असे ते म्हणाले आहे. या संदर्भात नवीन करार अतिशय महत्त्वाचा आहे. या कराराच्या वेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉनही उपस्थित होते. पंतप्रधान मोदींनी हा करार ऐतिहासिक असल्याचे सांगितले. पंतप्रधान मोदी म्हणाले की, हा करार भारत आणि फ्रान्समधील संबंध, नागरी विमान वाहतूक क्षेत्रातील भारताचे यश आणि अपेक्षा



प्रतिबिंबित करतो. पंतप्रधान मोदी म्हणाले, ''एअर इंडिया आणि एअरबस यांच्यातील या ऐतिहासिक कराराबद्दल मी मनः पूर्वक अभिनंदन आणि शुभेच्छा देऊ इच्छितो. या कार्यक्रमासाठी आमच्यात सामील झाल्याबद्दल माझे मित्र राष्ट्राध्यक्ष मॅक्रॉन यांचे विशेष आभार.''

पंतप्रधान म्हणाले की, आज भारताचे नागरी विमान वाहतूक क्षेत्र हे देशाच्या विकासाचा अविभाज्य भाग आहे आणि ते मजबूत करणे हा सरकारच्या राष्ट्रीय पायाभूत सुविधा धोरणाचा एक महत्त्वाचा पैलू आहे. ते म्हणाले की, गेल्या ८ वर्षांत भारतातील विमानतळांची संख्या ७४ वरून १४७ वर पोहोचली आहे. ते म्हणाले की, देशाच्या दुर्गम भागांना प्रादेशिक कनेक्टिव्हिटी योजनेद्वारे हवाई मार्गाने जोडले जात आहे. ज्यामुळे लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला चालना मिळत आहे. ते म्हणाले, नजीकच्या काळात भारत या क्षेत्रातील जगातील तिसरी सर्वात मोठी बाजारपेठ बनणार आहे.

# उच्च न्यायालयाचे निर्देश : नवाब मलिक खरेच आजारी आहेत, हे पटवून द्या; त्यानंतरच जामिनावर तातडीने सुनावणी घेऊ

**मुंबई : प्रतिनिधी**

नवाब मलिकांच्या जामिनावर तातडीनं सुनावणी हवी असल्यास ते खरंच आजारी आहेत हे आधी आम्हाला पटवून द्या, असे निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने दिले आहेत.

नवाब मलिकांच्या जामीन अर्जावर आज न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या पीठासमोर सुनावणी झाली. नवाब मलिकांनी जामिनासाठी हायकोर्टात अर्ज केला असून त्यावर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी केली आहे.

त्यावर नवाब मलिकांच्या वकिलांना उद्देशून न्यायमूर्ती मकरंद कर्णिक म्हणाले की, तुमच्या आधी आलेली बरीच प्रकरणे आमच्यासमोर प्रलंबित आहेत. त्यामुळे तुम्हाला वाट पहावी लागेल. अन्यथा नवाब मलिक हे खरेच आजारी आहेत, हे तुम्हाला पटवून द्यावे लागेल.

दरम्यान, नवाब मलिकांच्या जामीन अर्जाला ईडीतर्फे जोरदार विरोध करण्यात आला. ईडीतर्फे एएसजी अनिल सिंह यांनी बाजू मांडली. अनिल सिंह यांनी दावा केला की, नवाब मलिक हे पीएमएलए कायद्यातील कलम ४५ मधील तरतुदीनुसार आजारी नाहीत. त्यानंतर हायकोर्टाने नवाब मलिकांच्या जामिनावरील सुनावणी आठवडाभरासाठी तहकूब केली.

पुढील सुनावणी २१ फेब्रुवारीरोजी ठेवण्यात आली आहे. तसेच, पुढील सुनावणीत दोन्ही बाजूंच्या वकिलांना केवळ नवाब मलिक वैद्यकीय स्थितीवर युक्तिवाद करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.



सुनावणी दरम्यान नवाब मलिकांचे वकिल अमित देसाई यांनी सांगितले की, नवाब मलिकांची एक किडनी निकामी झाली आहे. त्यामुळे नवाब मलिक सध्या एकाच किडनीवर आहेत. तरीही रुग्णालयातून त्यांना डिस्चार्ज देण्यात यावा, अशी घाई ईडीकडून केली जात आहे. कुर्ला येथील क्रिटी केअर रूग्णालयामध्ये नवाब मलिक हे गेल्या अनेक महिन्यांपासून दाखल आहेत. किडनी ट्रान्सप्लांटसाठी त्यांना अन्य मोठ्या रूग्णालयात उपचार सुरू करायचे आहेत, अशी माहितीही अनिल देसाई यांनी हायकोर्टाला दिली. तसेच, न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांनी अनिल देशमुखांना प्रकृतीच्या धर्तीवरच राजीनामा दिला, असेही अ‍ॅड. देसाई यांनी सांगितले. मात्र, न्यायमूर्तींनी तातडीने दिलासा देण्यास नकार दिला. तसेच पुढील सुनावणीत नवाब मलिक यांच्या तब्येतीवरच युक्तिवाद करण्याचे निर्देश दोन्ही बाजूंच्या वकिलांना दिले.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी नोव्हेंबर २०२१ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि मंत्री नवाब मलिकांवर गंभीर आरोप केले होते. फडणवीस म्हणाले होते की, मलिकांच्या कंपनीने अशा लोकांकडून जमीन खरेदी केली आहे, जे १९९३ च्या मुंबई ब्लास्टमध्ये आरोपी आहेत. ही जमीन दाऊद इब्राहिमशी संबंधीत आहे. तसेच नवाब मलिकचे अंडरवर्ल्डशी संबंध असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. त्यानंतर ईडीने मनी लाँड्रींगप्रकरणीही नवाब मलिकांवर गुन्हे दाखल करत त्यांची कोट्यवधींची संपत्ती जप्त केली आहे.

**मलिकांची ही संपत्ती ईडीकडून जप्त**

कुर्ल्यातील गोवावाला कंम्पाऊंड जप्त, कुर्ला पश्चिमेतील व्यावसायिक जागा ईडीकडून जप्त, उस्मानाबादमधील मलिकांची १४८ एकर जमीन जप्त, कुर्ला पश्चिमेतील ३ फ्लॅट्स जप्त, वांद्रे पश्चिमेतील २ राहती घरंही ईडीकडून जप्त.

# पहिली महिला प्रीमियर लीग : ३.४० कोटींत निवडलेली स्मृती सर्वात महाग महिला क्रिकेटर; २० कोट्यधीश

**मुंबई : प्रतिनिधी**

पहिल्या वुमन्स प्रीमियर लीगचा लिलाव सोमवारी झाला. ५ संघांनी ४४८ महिला क्रिकेटपटूंमधून ८७ खेळाडू निवडले. २६ वर्षीय भारतीय फलंदाज स्मृती मानधनावर सर्वात जास्त पैशांचा पाऊस पडला आणि तिला आरसीबीने तब्बल ३.४० कोटी रुपयांना विकत घेतले. ऑस्ट्रेलियाच्या अ‍ॅश्ले गार्डनरला गुजरात जायंट्सने ३.२० कोटी रुपयांना आणि इंग्लंडच्या नेटली स्कीवर्सला मुंबई इंडियन्सने ३.२० कोटी रुपयांना विकत घेतले.

२००८ मध्ये पहिल्या आयपीएल दरम्यान चेन्नई सुपर किंग्जने महेंद्रसिंग धोनीला सर्वात महागडा खेळाडू म्हणून ९.५ कोटी रुपयांना खरेदी केले होते. महिला प्रीमियर लीगमध्ये चार देशांचे कर्णधार विकले गेले नाहीत. यामध्ये दक्षिण आफ्रिकेची सुने लुस, इंग्लंडची हीदर नाइट, श्रीलंकेची चमारी अटापट्टू आणि वेस्ट इंडिजची हेली मॅथ्यूज यांचा समावेश होता. लिलावात टॉप १० मध्ये ७ खेळाडू भारतीय तर ३ विदेशी आहेत. त्यापैकी भारताची ३३ वर्षीय हरमनप्रीत कौर सर्वात वयस्कर असून १९ वर्षीय शेफाली वर्मा सर्वात लहान आहे. यूपीने महाराष्ट्राच्या देविका वैद्यला १.४ कोटी रुपयांना विकत घेतले. मुंबईने अमनजोत कौरला ५० लाखांना विकत घेतले. ऑस्ट्रेलियाचा अष्टपैलू खेळाडू ग्रेस हॅरिस ७५ लाखांत यूपी संघात सामील झाला.

सोफीला यूपीने निवडले, दिले १.८० कोटी रुपये : इंग्लंडची अष्टपैलू खेळाडू सोफी एक्लेस्टोनला यूपीने १.८० कोटी रुपयांना विकत घेतले. ऑस्ट्रेलियाच्या एलिस पेरीला बंगळुरूने १.७० कोटी रुपयांना विकत घेतले आणि न्यूझीलंडची कर्णधार सोफी डेव्हाइन ५० लाख रुपयांच्या मूळ किमतीत संघाचा भाग बनली.

# एलटीटीई प्रमुख प्रभाकरन जिवंत असल्याचा दावा थट्टा : श्रीलंकेची स्पष्टोक्ती

## तो २००९ मध्येच मारला गेला, डीएनए टेस्टनेही पुष्टी झाली

**कोलंबो/नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

श्रीलंकेच्या संरक्षण मंत्रालयाने एलटीटीई प्रमुख वेलुपिल्लई प्रभाकरन जिवंत असल्याचा दावा फेटाळून लावला आहे. ते म्हणाले - प्रभाकरन जिवंत असल्याचा दावा करणे म्हणजे थट्टा केल्यासारखे आहे. तो १९ मे २००९ मध्येच मारला गेला. त्याची पुष्टी डीएनए टेस्टद्वारेही झाले आहे.

तामिळनाडूचे काँग्रेस नेते व वर्ल्ड कन्फेडरेशन ऑफ तामिळचे अध्यक्ष पाझा नेदुमारन यांनी सोमवारी लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ ईलम अर्थात लिट्टेचा म्होरक्या वेलुपिल्लई प्रभाकरन जिवंत असल्याचा दावा केला होता.

श्रीलंकन सरकारने १८ मे २००९ रोजी एलटीटीई चीफ प्रभाकरन याच्या मृत्यू घोषणा केली होती. तसेच लिट्टेचाही सफाया झाल्याचे स्पष्ट केले होते.

श्रीलंकन सरकारने १८ मे २००९ रोजी एलटीटीई चीफ प्रभाकरन याच्या मृत्यू घोषणा केली होती. तसेच लिट्टेचाही सफाया झाल्याचे स्पष्ट केले होते.

**श्रीलंकेने डीएनए टेस्टद्वारे केली होती प्रभाकरनच्या मृत्यूची पुष्टी**

प्रभाकरनला १८ मे २००९ रोजी श्रीलंकन सरकारने मृत घोषित केले होते. तो १७ मे २००९ रोजी देशाच्या उत्तर भागात झालेल्या एका चकमकीत मारला गेल्याचा दावा सरकारने केला होता. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्याचा मृतदेह श्रीलंकन मीडियावरही दाखवण्यात आला होता. त्यानंतर आठवड्याभराने लिट्टेचा प्रवक्ता सेल्वारासा पथ्मनाथान यांनी प्रभाकरनच्या मृत्यूची पुष्टी केली होती. तद्नंतर २ आठवड्यांनी डीएनए टेस्टमध्येही हा मृतदेह प्रभाकरनचाच असल्याची पुष्टी झाली होती. प्रभाकरनसोबत त्याचा अँथनी चार्ल्सही ठार झाला होता.

भारताचे दिवंगत पंतप्रधान राजीव गांधी यांनी २९ जुलै १९८७ रोजी श्रीलंकेसोबतच्या शांतता करारावर स्वाक्षरी केली होती.

एलटीटीईच्या कारवायांमुळे श्रीलंकेत गृहयुद्ध सुरू झाले होते. ते थांबवण्यासाठी २९ जुलै १९८७ रोजी भारत व श्रीलंकेत एक शांतता करार झाला होता. १९८७ मध्ये एलटीटीई विरोधात भारताने आपले सैन्य पाठवले होते. भारताच्या या निर्णयामुळे लिट्टेने भारतावर सूड उगवण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार त्यांनी राजीव गांधी यांची हत्या करून आपला सूड उगवला.

राजीव गांधी यांची २१ मे १९९१ रोजी तामिळनाडूच्या श्रीपेरंबुदूर येथील एका निवडणूक रॅलीत लिट्टेच्या धनु नामक एका आत्मघातकी हल्लेखोराने हत्या केली होती. धनुने (तेनमोजी राजरत्नम) राजीव यांच्या गळ्यात फुलांचा हार टाकला. त्यानंतर त्यांच्या पाया पडली. त्यानंतर तिने कंबरेला बांधलेल्या स्फोटकांचा स्फोट घडवला. हा स्फोट एवढा जबरदस्त होता की, त्यात अनेकांच्या अक्षरशः चिंधड्या झाल्या. राजीव व हल्लेखोर धनु यांच्यासह १६ जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. तर ४५ जण गंभीर जखमी झाले.

# यूएस राष्ट्रपती निवडणूक २०२४ : भारतीय वंशाच्या निक्की हेली अमेरिकेच्या पुढील राष्ट्राध्यक्षाची निवडणूक लढवणार

**न्यूयार्क : वृत्तसंस्था**

भारतीय वंशाच्या रिपब्लिकन नेत्या निक्की हेली यांनी मंगळवारी (१४ फेब्रुवारी) अमेरिकेत २०२४ मध्ये होणाऱ्या राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक लढवण्याची घोषणा केली आहे. त्यासाठी त्यांनी आपला दावा मांडला. हेली या दक्षिण कॅरोलिनाच्या माजी गव्हर्नर आणि संयुक्त राष्ट्रात अमेरिकेच्या माजी राजदूत राहिल्या आहेत.

२०२४ ची अध्यक्षीय निवडणूक लढवणार असल्याची घोषणा केल्यानंतर त्या रिपब्लिकन पक्षाच्या उमेदवारीसाठी माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासाठी पहिले मोठे आव्हान देणारी ठरल्या आहेत. २०२४ मध्ये व्हाईट हाऊससाठी त्या आपल्या माजी बॉसला म्हणजेच ट्रम्प यांना आव्हान देणार नाही असे त्यांनी दोन वर्षांपूर्वी सांगितले होते.

भारतीय वंशाच्या रिपब्लिकन नेत्या निक्की हेली यांनी अमेरिकेतील २०२४ च्या अध्यक्षीय निवडणुकीसाठी आपला दावा मांडल्यानंतर त्या माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना आव्हान देणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीसाठीचा दावा त्यांनी व्हिडिओच्या माध्यमातून मांडला.

'वॉशिंग्टन पोस्ट'च्या वृत्तानुसार - ट्रम्प यांना आव्हान देणाऱ्या रिपब्लिकन पक्षात अनेक मोठी नावे समाविष्ट आहेत. निक्की हॅले यांनी घोषणा केली आहे, परंतु अशी अनेक नावे आहेत ज्यांनी अद्याप त्यांचे कार्ड उघडलेले नाहीत.

'वॉशिंग्टन पोस्ट'च्या वृत्तानुसार - ट्रम्प यांना आव्हान देणाऱ्या रिपब्लिकन पक्षात अनेक मोठी नावे समाविष्ट आहेत. निक्की हॅले यांनी घोषणा केली आहे, परंतु अशी अनेक नावे आहेत ज्यांनी अद्याप त्यांचे कार्ड उघडलेले नाहीत.




दोन वर्षांपूर्वी त्या ट्रम्प यांच्यासाठी आव्हान नव्हत्या. पण आता त्यांनी आपला विचार बदलला आहे. खरं तर, भारतीय वंशाच्या अमेरिकन रिपब्लिकन पक्षाच्या नेत्या निक्की हेली यांनी गेल्या महिन्यातच जो बायडेन यांच्या विरोधात २०२४ च्या अमेरिकन राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक लढवण्याचे संकेत दिले. त्याचे पालक भारतातील अमृतसर येथील आहेत.

जानेवारीमध्ये फॉक्स न्यूजच्या मुलाखतीत, अमेरिकन रिपब्लिकन पक्षाच्या नेत्या निक्की हेली यांना विचारण्यात आले होते की, त्या २०२४ च्या अमेरिकन राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक लढवणार आहे का? तर त्यांनी उत्तर दिले की, नवीन पिढीसाठी, नवीन नेतृत्वाची वेळ आली आहे आणि आपला देश परत घेण्याची वेळ आली आहे. अमेरिका लढायला तयार आहे आणि आम्ही आता सुरुवात करत आहोत.

रिपब्लिकन पक्षाच्या नेत्या निक्की हेली म्हणाल्या होत्या की, जो बायडेन दुसऱ्या कार्यकाळासाठी पात्र नाहीत. नेतृत्व करू शकतील आणि निवडणुका जिंकू शकतील अशा रिपब्लिकन लोकांना पुन्हा सरकारमध्ये आणण्याची गरज आहे. ५ नोव्हेंबर २०२४ रोजी अमेरिकेत राष्ट्राध्यक्षपदाची निवडणूक होणार आहे. या मुलाखतीत त्यांनी सांगितले की, देशाला एका नव्या दिशेने घेऊन जाण्यासाठी मी एक नेता म्हणून उदयास येऊ शकते.



रम्य अशी संध्याकाळ.. दिवे लागण्याची वेळ, त्यातच सूर्य अस्ताला गेलेला, आकाशात पसरलेल्या नारंगी रंगाच्या गडद होत जाणाऱ्या छटा, लुकलुकणाऱ्या चांदण्या आणि त्यातच या संध्याकाळच्या वेळी दिसणारे सातारच्या नटराज मंदिरातून घेतलेले हे अतिशय विलोभनीय दृश्य आपल्या कॅमेऱ्यात टिपले आहे अतुल देशपांडे यांनी...

# राज्यात पुन्हा थंडीची झुळूक; मराठवाडा - विदर्भाच्या काही भागांमध्ये किमान तापमानात घट

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्रात मागील चार दिवसांपासून तापमानाचा पारा वाढलेला असताना मध्य मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागांत दोन दिवस तापमानात घट होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. उत्तर विदर्भ व उत्तर महाराष्ट्राच्या काही भागात याचा प्रभाव अधिक असेल. राज्यातील तापमानात सातत्याने चढउतार होत आहेत.

राज्यातील उत्तरेत किमान तापमानात होणारी घट कायम आहे. धुळे, पुणे नाशिक, आणि औरंगाबाद येथे किमान तापमानात १० अंश सेल्सियसच्या आसपास तापमान नोंदवले गेले. विदर्भासह मराठवाड्यातही तापमानात घट झाली आहे.

मागच्या २४ तासांत सोलापूर जिल्हयात ३७.२ अंश तापमानासह उच्चांकी तापमानाची नोंद झाली. तर धुळे जिल्हयात ८ अंश सेल्सियस एवढे सर्वात कमी तापमान नोंदवले गेले. मुंबईकरांना दोन दिवसांपासून प्रचंड उकाडा सहन करावा लागत आहे. रविवारी मुंबईत ३६ अंश कमाल तापमानाची नोंद झाली. १५ फेब्रुवारीनंतर तापमानात अजून वाढ होण्याची शक्यता आहे.

दरम्यान मागच्या २४ तासांत पुणे ३४.१ (१०.६), जळगाव ३३ (१०.१), धुळे ३२ (८), कोल्हापूर ३५ (१९), महाबळेश्वर ३१.६ (१३.४), नाशिक ३१.२ (१०.९), सांगली ३६.१ (१७.३), सातारा ३५.२ (१६.४), सोलापूर ३७.२ (१६.५), रत्नागिरी ३६.४ (२१.२), औरंगाबाद ३२.२ (१०.२), नांदेड (१६.२), परभणी ३४.४ (१३.४), अकोला ३५ .२ (१२.५), ४.८), ब्रम्हपुरी ३३.७ (१४.६), चंद्रपूर ३१ (११), नागपूर ३१.८ (११.७) तापमानाची नोंद झाली.

महाराष्ट्रात काही भागात उन्हाचा कहर वाढला आहे. काही ठिकाणी ३५ अंशांवर तापमान पोहोचले आहे. दिवसभर उन्हाचा चटका आणि रात्री थंडी अशा परिस्थितीमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे.